समाजप्रबोधन व सोयरे संबंध जुळवणारा । घराघरांत अन् मनामनांत पोहचणारा ।।

मासिक

# माळी आवाज







संस्थापक - स्व. विजयकुमार नारायण लडकत
वार्षिक वर्गणी रु. २००/-
वर्ष २०, अंक जानेवारी २०२५ (मासिक)
एकूण पृष्ठे २४

Mali Aawaj • Pune • Vol. 20 • Issue No. 8 • January 2025 (Monthly) • Pages 24

भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका आणि समाजसुधारक







## सावित्रीबाई फुले

यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !!!

# वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा



दिलीप धामणे
१ जानेवारी



बाळासाहेब बुनगे
१९ जानेवारी



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले
यांच्या पुतळ्याला
पुष्पहार अर्पण करताना
माळी आवाजच्या संपादिका
रागिनी विजयकुमार लडकत



१. नांव : ***सिध्दांत रामचंद्र गार्डे, पुणे*** शिक्षण : एमबीए (सप्लाय चेन मॅनेजमेंट), कॅनडा
जन्म ता.: ०८/०३/१९९७ जन्मवेळ : प. २.४५मि. जन्म ठिकाण : मनमाड
उंची : ५'.११'' देवक : रक्त गट : B+ve वर्ण : गहूवर्ण बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : कॅनडा मासिक प्राप्ती : ७५०००
इतर माहिती : आई, वडील, २ बहिणी अविवाहीत
अपेक्षा : उच्चशिक्षित, कॅनडामध्ये ५ वर्ष राहण्याची तयारी असावी



२. नांव : ***तेजस सुर्यकांत ननावरे, मुंबई*** शिक्षण : बीई कॉम्प्युटर, सायन्स, एमएस, शिकागो, युएस
जन्म ता.: ०३/०२/१९९७ जन्मवेळ : स. ११.२५ मि.
उंची : ६' देवक : पाचपालवी रक्त गट : AB +ve जन्म ठिकाण : वाई
नोकरी/व्यवसाय : नोकरी अमेरिका वर्ण : गोरा बांधा : सडपातळ
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण विवाहीत मासिक प्राप्ती :
अपेक्षा : सुस्वरुप, आयटी क्षेत्रात नोकरी करणारी, अमेरिकेत असल्यास प्राधान्य



३. नांव : ***रितेश दिनानाथ गोरे, बदलापूर*** शिक्षण : एमबीए (फायनान्स)
जन्म ता.: १५/०३/१९९८ जन्मवेळ : रा. ८.४३ जन्म ठिकाण : मुंबई
उंची : ५'.७'' देवक : सूर्यफूल रक्त गट : A +ve वर्ण : निमगोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : नोकरी, मुंबई मासिक प्राप्ती : ७,५०,०००/-
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण विवाहीत
अपेक्षा : सुस्वभावी, सुसंस्कृत, नोकरी करणारी



४. नांव : ***रजत सुरेश भाकरे, पुणे*** शिक्षण : बीटेकफुड टेक्नॉलॉजी
जन्म ता.: ०६/०१/१९९४ जन्मवेळ : स. ८.१० जन्म ठिकाण : पुणे
उंची : ५'.११'' देवक : पाचपालवी रक्त गट : O +ve वर्ण : गौरवर्ण बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : नोकरी गुवाहटी मासिक प्राप्ती : २१ ला.वा.,
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ अविवाहीत
अपेक्षा : उच्चशिक्षित, ग्रॅज्युएट, सुसंस्कृत फॅमिली



५. नांव : ***सोमनाथ जंबूकुमार माळी, पुणे*** शिक्षण : बीई कॉम्प्यु. आणि सिडॅक
जन्म ता.: ०९/१२/१९९१ जन्मवेळ :दु. २.४० मि. जन्म ठिकाण : चंदननगर
उंची : देवक : पाणकणीस रक्त गट : वर्ण : सावळा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : नोकरी, पुणे मासिक प्राप्ती : १६.५ ला.वा.,
इतर माहिती : आई, वडील, २ बहिणी विवाहीत.
अपेक्षा : शाकाहारी, सुशिक्षित, मनमिळावू स्वभाव, नोकरी करण्यास इच्छुक




६. नांव : ***महेश शिवाजी राऊत, सोलापूर*** शिक्षण : बीई मेकॅनिकल
जन्म ता.: २३/११/१९९३ जन्मवेळ : रा. ४.१३ मि. जन्म ठिकाण : कंवठेमहांकाळ
उंची : ५'.६'' देवक : आंबा डहाळी रक्त गट : AB+ve वर्ण : गोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : नोकरी, पुणे मासिक प्राप्ती : ५००००/-
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ अविवाहीत, १ बहिण विवाहीत.
अपेक्षा : बीई कॉम्प्युटर, आयटी फिल्ड, नोकरीस प्राधान्य, बीसीएस, एमसीएस



७. नांव : ***अमित संपतराव चौरे, पुणे*** शिक्षण : बॅचलर ऑफ फाईन आर्टस
जन्म ता.: २४/०४/१९९४ जन्मवेळ : स. १०.५५ जन्म ठिकाण : हडपसर
उंची : ५'.१०'' देवक : सुर्यफूल रक्त गट : A +ve वर्ण : गोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : नोकरी मासिक प्राप्ती : ५००००/-
इतर माहिती : आई, वडील, २ बहिणी विवाहीत
अपेक्षा : अनुरुप



८. नांव : ***श्रीयश सुनिल जांभुळकर, पुणे*** शिक्षण : बीई मेकॅ.
जन्म ता.: २०/०२/१९९७ जन्मवेळ : सं. ७.५९ जन्म ठिकाण : पुणे
उंची : ६' देवक : पाचपालवी, सौंदड रक्त गट : O +ve वर्ण : गोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : व्यवसाय फॅब्रिकेशन मासिक प्राप्ती : ८ ला.वा.
इतर माहिती : आई, वडील, एकूलता १
अपेक्षा : पदवीधर, अनुरुप, सुस्वभावी



९. नांव : ***निखिल प्रशांत माळी, डोंबिवली पूर्व*** शिक्षण : बीई (ई अँड टीसी) एमबीए (टेलिकॉम अँड मार्केटींग)
जन्म ता.: १२/११/१९९६ जन्मवेळ : स. ७.४५ मि.
उंची : ५'.६'' देवक : उंब्राच झाडे रक्त गट : अ +ंश जन्म ठिकाण : डोंबिवली
नोकरी/व्यवसाय : नोकरी, मुंबई वर्ण : गोरा बांधा : मध्यम
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण अविवाहीत मासिक प्राप्ती : ७ ला. २५ ह.वा.
अपेक्षा : अनुरुप



१०. नांव : ***वैभव कैलास वचकल, पुणे*** शिक्षण : एमसीएस ( मास्टर इन कॉम्प्युटर सायन्स)
जन्म ता.: ११/०६/१९९३ जन्मवेळ :रा. ८.४० मि. जन्म ठिकाण : केडगाव
उंची : ५'.११'' देवक : पाचपालवी (सौंदड) रक्त गट : B +ve वर्ण : गोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : सॉफ्टवेअर डेव्हलपर मासिक प्राप्ती : ४०,०००/-
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण विवाहीत
अपेक्षा : पदवीधर, अनुरूप, उंची ५.५ किंवा त्यापेक्षा जास्त



११. नांव : ***निलेश मनोहर भुजबळ, पुणे*** शिक्षण : इंजि. डिप्लोमा इन मेटॅलॉर्जी
जन्म ता.: २७/०६/१९९६ जन्मवेळ : रा. १० वा. जन्म ठिकाण : लोणंद
उंची : ५'.६'' देवक : पाचपालवी, सौंदड रक्त गट : AB +ve वर्ण : गव्हाळ बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : नोकरी, पुणे मासिक : ७००००/-
इतर माहिती : आई, १ बहिण विवाहीत
अपेक्षा : सुसंस्कृत, नोकरी करणारी, अनुरुप, सुंदर



१२. नांव : ***निखिल किशोर वाघ, पुणे*** शिक्षण : डिप्लोमा इन सिव्हील इंजिनिअर
जन्म ता.: २८/०५/१९९५ जन्मवेळ : स ७.१५ मि. जन्म ठिकाण : पुणे
उंची : ५'.८'' देवक : पाचपावली,सुर्यफूल रक्त गट : वर्ण : कृष्णवर्ण बांधा : सडपातळ
नोकरी/व्यवसाय : गव्हेंमेंट कॉंट्रॅक्टर मासिक प्राप्ती : १,२०,००० ह.मा.,
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण विवाहीत
अपेक्षा : उच्चशिक्षित, नोकरी करणारी



१३. नांव : ***महेश गोपीनाथ माळी (गोरे), धाराशिव*** शिक्षण : बीए, एमए (इंग्रजी), डिएड, बीएड, एमफील, पीएचडी, निट चालू
जन्म ता.: ०१/०९/१९९० जन्मवेळ : स. ९.२५ मि.
उंची : ५'.६'' देवक : पाचपालवी रक्त गट : O +ve जन्म ठिकाण : केशेगाव
नोकरी/व्यवसाय : नवले प्राथमिक शाळा (मनपा), पुणे वर्ण : सावळा बांधा : मध्यम
इतर माहिती : आई, १ भाऊ विवाहीत मासिक प्राप्ती : १६ ह.मा.,
अपेक्षा : नोकरी, पदवीधर



१४. नांव : ***प्रणव शिवाजी गरुड, पुणे*** शिक्षण : बीकॉम
जन्म ता.: ३०/१०/१९९९ जन्मवेळ : दु. ४.१५ मि. जन्म ठिकाण : पुणे
उंची : ५'.९'' देवक : सौंदडीचा वेल रक्त गट : B +ve वर्ण : निमगोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : मल्टी स्टेट को-ऑप. बँक मासिक प्राप्ती : २५०००/-
इतर माहिती : आई, वडील, २ बहिणी विवाहीत
अपेक्षा : सुशिक्षित, समजूतदार

# ● मासिक माळी आवाज संपादक व प्रतिनिधी मंडळ ●

## माळी आवाज

आपले समाजाचे मुखपत्र,
मनामनांत आणि घराघरांत सर्वात
लोक प्रिय, माळी आवाज.



### संस्थापक

स्व. विजयकुमार नारायण लडकत

### संपादिका

रागिणी विजयकुमार लडकत
फोन
८७६७५ ८१९०६
९१५८३ ३३७५८

### प्रकाशन स्थळ

२३, गौरव को-ऑप. हौ. सोसायटी,
सनसिटी रोड, विश्व मेडिसिनमागे,
आनंदनगर, पुणे - ४११०५१.

### मुद्रण

शिवानी प्रिंटर्स,
शॉप नं, ७८९, १३११ कसबा पेठ,
पुणे ४११ ०११

### अक्षरजुळणी आणि डिझाईनींग

देवदत्त एन्टरप्रयाजेस
योगेश काकडे
गणेश नगर, धायरी,
सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१.
मो. ९८८१३०३५९४

### पुणे विभाग

**प्रा. आदेश बनकर**
मु. पो. निमगाव केतकी, ता. इंदापूर,
जि. पुणे. मो. ९६६५२५३४४८

**सौ. कल्पना करपे**
९०८, गोखलेनगर, वीर बाजीप्रभूशाळेजवळ,
पुणे ४११ ०१६. मो. ९९६०४९८८४९

**अंजली भुजबळ**
नं. ३०२, रुतुजा पार्क,
सिल्व्हरबर्च हॉस्पिटलच्या मागे,
रायकर मळा, धायरी, पुणे ४११०४१.
मो.: ९७६३६५५६२७

### लातूर विभाग

**प्रा. लक्ष्मण धोंडीराम बादाडे**
पार्थ अपार्टमेंट, फ्लॅट क्र. १०३,
अश्वमेघ हॉटेल मागे, महादेव मंदिर समोर,
सुभाष नगर, जुना एमआयडीसी रोड, लातूर,
जि. लातूर - ४१३५१२
मो. ७७६८८८६५६०, ९४२३४९७०८०

### सातारा विभाग

**सौ. शीला गिते**
उमेश, कोटेशवर कॉलनी, अर्क शाळेजवळ,
सातारा, मो. ९६२३६९२०४४

**श्री. वसंतराव नेवसे**
१०३, दत्तनगर, एस.टी.स्टँड मागे,
मु. पो. वाई, जि. साताराण
मो. ८१४९०१३८६५

### औरंगाबाद विभाग

**सौ. चंद्रकला पाथरे**
प्लॉट नं. १८, बिजली नगर,
उस्मानपुरा, औरंगाबाद.
मो. : ९४२०२४२१६५

### वधूवर नोंदणी फी

इंटरनेट, सर्व संचालकांकडे नोंदणी,
१ वर्षासाठी : रु. २३००/- +
क्लासिफाईड रु. ३००/- +
वार्षिक वर्गणी रु. २००/- = २८००/-

### नाशिक विभाग

**सौ. उज्ज्वला कमोद**
फ्लॅट नं.११, तिसरा मजला, श्रीनंद अपार्टमेंट ,
अपेक्स हॉस्पिटल, चौक नं. ४, गोविंदनगर,
नाशिक -४२२०११
मो.९८६७५११९४९४
वेळ : दु. ११ ते १, सं. ५ ते ७

### सोलापूर विभाग

**श्री. प्रसन्नकुमार शिंदे**
खेलो टॉईज आणि स्पोर्टस्, सुजयनगर,
०७ बायपास रोड, सी.एस.बी. बँकेशेजारी,
शहा ब्रदर्स शोरुम जवळ, अकलूज,
ता. माळशिरस, जि. सोलापूर - ४१३१०८
मो.: ७८७५४४४७५५

### ठाणे कल्याण विभाग

**सौ. शुभांगी शिंदे**
२/१०/आनंदकुंज, सीएचएस,
को. ऑ. हौ. सोसायटी, आनंद विहार,
खारेगाव, रेल्वेक्रॉसिंग जवळ, खारेगाव,
कळवा ईस्ट - ४००६०५
मो.: ८७७९५३८८२६

**सौ. उज्ज्वला कमोद**
आदर्श सोसायटी, डी-९/२०५,
सेक्ट.-९, घरोंदा, घणसोली,
नवी मुंबई ४००७०१. मो.: ९८६७५१९४९४
वेळ : दु. ११ ते १, सं. ५ ते ७

**सौ. रंजना जाधव**
फ्लॅट नं. २०४, शिशिर सुदामा, आर. एम/९५,
ममता हॉस्पिटलजवळ, कामत हॉस्पिटलसमोर,
एमआयडीसी, निवास, डोंबीवली, (पू) ४२१२०३
मो ९१६७७७३५६६ / वेळ : दु. १२ ते ४

### मासिकाची वार्षिक वर्गणी

रु. २००/-

**वधू-वर सूचक केंद्र कार्यालय**
१, रासकर पॅलेस, चिंतामणी नगर,
नं.२ शेजारी, बिबवेवाडी,
पुणे - ४११०३७
फोन : ०२०-२४२८१११०

# ❖ अंतरंगात ❖


| अ. क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १. | संपादकीय – लोकमाता सावित्रीबाई ज्योतिबा फुले | ६ |
| २. | भावनांना वाट द्या | ८ |
| ३. | मुशाफिरी – निसर्गसंपन्न अंदमान भाग ३ | ९ |
| ४. | मी सावित्री बोलते | ११ |
| ५. | समाजवृत्त | १३–१४ |
| ६. | वधू–वर सूची | १५–२० |
| ७. | क्लासिफाईड | ३, ४ २२, २३ |


**● लेखकांसाठी सूचना ●**

'माळी आवाज' या मासिकातून आपण अनेक लेखकांचे लेख प्रकाशित करीत असतो, तरी पुढील महिन्यांच्या अंकासाठी ५ तारखेपर्यंत आपण लेख पाठवावेत. सदर लेख हे विषयास अनुसरुन, सुवाच्च अक्षरात द्यावेत. तसेच ज्यांना शक्य असेल त्यांनी टाईप करुन लेख पाठवावेत ही विनंती.

***मासिक माळी आवाज कार्यालयीन वेळ***

मंगळवार ते शनिवार – संध्याकाळी ४ ते ७

रविवार – सकाळी ११ ते २

सोमवार सुट्टी

# संपादकीय



## लोकमाता सावित्रीबाई ज्योतिबा फुले

'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उदधारी' या उक्तीप्रमाणे समाजातील स्त्रियांना मुलींना शिक्षण मिळावं म्हणून आजन्म सावित्रीबाई आणि महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षण सेवेचा वसा घेतला. महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व जाणले होते म्हणूनच आपल्या निरक्षर सावित्रीस त्यांनी प्रथम साक्षर केले आणि समाजात एक आदर्श निर्माण केला.

सावित्री बाईंनी ज्योतिबांच्या सर्व कार्यात हिरीरीने भाग घेतला. स्त्रियांनी शिकले पाहिजे हेच त्यांचे ब्रीदवाक्य होते. समाजातील वंचितांसाठीही त्यांनी झोकून देऊन काम केले. प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे स्त्री असते याचे उत्तम उदाहरण म्हणजे सावित्रीबाई फुले होत. एक जानेवारी इसवी सन १८४८ रोजी भिडे वाड्यात ज्योतिराव आणि सावित्रीबाई यांनी मुलींची पहिली शाळा काढली. या शाळेत सावित्रीबाई मुख्याध्यापिका म्हणून काम पाहू लागल्या. त्या काळात पुण्यातील अन्य भागातही दोन–तीन मुलींच्या शाळा सुरु केल्या व त्याही चालवल्या. अंगावर शेणा–मातीचे, चिखलाचे गोळे सहन केले. लोकांच्या शिव्या सहन केल्या पण न डगमगता त्यांनी आपले कार्य नेटाने पुढे सुरु केले.

सावित्रीबाईंच्या शाळेत सुरवातीला केवळ सहा मुली होत्या पण हळूहळू ही संख्या वाढून ४० ते ४५ पर्यंत जाऊन पोहोचली. अर्थातच या त्यांच्या यशस्वी कार्याला तत्कालीन सनातन्यांनी विरोध केला. परंतु संघर्षाचा चाबुक हातात घेत शिक्षण प्रसाराचा हा उपक्रम त्यांनी सुरुच ठेवला. अनेक आघात होऊनही सावित्रीबाई आणि ज्योतिबा अजिबात डगमगले नाहीत.

बालविवाहामुळे अनेक मुली वयाच्या बाराव्या

तेराव्या वर्षीच विधवा व्हायच्या. तत्कालीन समाजाला विधवा पुनर्विवाह अजिबात मान्य नव्हता. पती निधनानंतर अशा स्त्रियांना सती जावे लागे किंवा त्यांचे केशवपण करुन त्यांना विद्रुप केले जाई. अतिशय गुलामीच्या अवस्थेत या स्त्रियांना आपले पुढील जीवन जगावे लागे. एवढेच नाही तर गरोदर विधवा म्हणून जर काही स्त्रिया असतील तर जन्माला येणाऱ्या मुलांना यातनांशिवाय काहीच मिळणार नाही. अशा विचारांनी या विधवा आत्महत्याही करत किंवा यावर उपाय म्हणून ज्योतिबांनी बालहत्या प्रतिबंधक गृह सुरु केले. सावित्रीबाईंनी समर्थपणे हे कार्य चालवले. फसलेल्या किंवा बलात्काराने गरोदर राहिलेल्या विधवांचे त्यांनी बाळंतपण केले. सावित्रीबाई या सर्व बालकांना आपलीच मुले मानत. याच ठिकाणी जन्मलेल्या काशीबाई या ब्राह्मण विधवेचे मूळ सावित्रीबाईंनी दत्तक घेतले आणि त्याचे नाव यशवंत ठेवले.

ज्योतिराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या कार्यातही सावित्रीबाईंनी मोलाचे कार्य केले. काव्यफुले व बावन्नकशी या आपल्या साहित्याच्या माध्यमातून त्यांनी अनेक चांगल्या विचारांचा प्रसार केला. पुढील काळात त्यांची भाषणेही प्रकाशित करण्यात आली.

एकंदरीतच तत्कालीन समाजात असलेल्या महिला हक्क, अस्पृश्यता निर्मूलन, स्त्रीशिक्षण, सती प्रथा, बालविवाह, विधवा पुनर्विवाह आणि अंधश्रध्दा निर्मूलन यासारख्या महान कार्यात ज्योतिबा फुले यांच्या खांद्याला खांदा लावून सावित्रीबाईंनी बहुमोल असे कार्य केले. ज्योतिबा फुले यांच्या निधनानंतर सावित्रीबाईंनी स्वतःला समाजसेवेत गुंतून घेतले व हिरीरीने ज्योतिबांचे कार्य पुढे चालू ठेवले.

फुले दांपत्यांचा मुलगा यशवंत याच्या मदतीने सावित्रीबाईंनी समाजासाठी चांगले कार्य केले. १८९७ मध्ये पुण्यामध्ये प्लेग या रोगाचा प्रसार झाला. यावेळी सावित्रीबाई व यशवंत यांनी प्लेगच्या रुग्णांच्या उपचारासाठी रुग्णालय सुरु केले. पुण्याच्या या रुग्णालयात अन्याय रुग्णांवर उपचार करण्यात आले. सावित्रीबाई स्वतः रुग्णांची काळजी घेत. रुग्णसेवा करतानाच त्या देखील आजारी पडल्या आणि दहा मार्च १८९७ रोली सावित्रीबाईंचा मृत्यू झाला.

आज आपण तीन जानेवारी हा सावित्रीबाईंचा जन्मदिवस संपूर्ण महाराष्ट्रात 'बालिका दिन' म्हणून साजरा करतो. एवढेच नाही तर 'महिला मुक्ती दिन' म्हणूनही साजरा करतो. तमाम भारतवासीयांना या माऊलीचा खूप आदर वाटतो. सावित्रीबाई आणि महात्मा फुले यांनी आज शिक्षणाची कवाडे स्त्रियांसाठी उघडी केली. म्हणूनच सर्व क्षेत्रात स्त्रियांनी यशाचे शिखर गाठले आहे. या सर्व स्त्रियांच्या जीवनावर सावित्रीबाई महात्मा फुले यांच्या कार्याचा ठसा उमटवलेला पाहायला मिळतो. स्त्रीजातीचा खऱ्या अर्थाने उध्दार त्यांनी केला. समाजातील उच्च–नीच, श्रेष्ठ–कनिष्ठ असा भेदभाव दूर करण्याचे मोठे कार्य त्यांनी केले. अज्ञानाने अंधारलेल्या स्त्री जीवनात ज्ञानाची ज्योत पेटवली. आज स्त्री ज्या यशाच्या शिखरावर पोहोचली आहे त्याचे सारे श्रेय हे केवळ सावित्रीबाईंना जाते.

चूल आणि मूल या चक्रात अडकलेल्या स्त्रियांना योग्य दिशा सावित्रीबाईंनी दाखवली ती केवळ शिक्षणाच्या जोरावरच. शिक्षणाचे महत्त्व लहान सहान सगळ्यांना समजले. समाजाने घातलेले अनेक घाव सावित्रीबाईंनी सोसले. निकटवर्तीयांचा रोष पत्करला. परंतु एखाद्या मशालीसारखे आपले कार्य सतत ठेवून निर्भीडपणाची साक्ष त्यांनी दिली. सावित्रीबाई झुंजत राहिल्या सतत समाजातील स्त्रियांसाठी.

भारतीय स्त्रिया कधीच सावित्रीबाईंचे ऋुण फेडू शकत नाहीत. तीन जानेवारी या स्त्री मुक्ती दिनाच्या व बालिका दिनाच्या सर्व तमाम स्त्रियांना मासिक माळी आवाज परिवाराच्या वतीने खूप खूप शुभेच्छा...



# भावनांना वाट द्या.



लेखन – डॉ. दत्ता कोहिनकर
माईंड पॉवर ट्रेनर
मो.: ९८२२६३२६३०

रुपेशचे वडिलांवर खूप प्रेम होत्रे परंतु वडिलांना विश्वासात न घेता परस्पर रजिस्टर्ड प्रेमविवाह केल्याने वडिलांबरोबर त्याचे कडाक्याचे भांडण होऊन त्याला घर सोडावे लागले होते. पाच वर्षे झाली होती. तो वडिलांशी बोलत नव्हता. काही लग्न समारंभात वडिलांना नमस्कार करुन बोलावेसे वाटायचे पण त्या भावना तो अहंकारामुळे दाबून ठेवून वडिलांपासून दूर जात असे. विपश्यनेच्या, ध्यानाच्या शिबीरीत त्याला वडिलांची खूप आठवण आली व वडिलांनी त्याच्यासाठी उचललेल्या कष्टांनी त्याचे मन भरुन आले, अपराधेपणाची भावना त्याने आचार्यांजवळ व्यक्त केली.

शिबीर संपल्यानंतर आचार्यांनी त्याला वडिलांकडे जाऊन ''माझे तुमच्यावर खूप प्रेम आहे, मी तुमचा खूप ऋणी आहे'', असा भाव व्यक्त करावयास सांगितला. शेवटी शिबीर संपल्यावर तो डायरेक्ट वडिलांकडे गेला. बेल वाजवल्यावर वडिलांनीच दार उघडावे अशी त्याने केलेली तीव्र इच्छा पूर्ण झाली. बेल वाजल्यानंतर वडिलांनीच दार उघडले. तो म्हणाला, ''बाबा–माझं तुमच्यावर खूप प्रेम आहे. मी तुमचा ऋणी आहे.'' बाबांनी हे ऐकताच त्याला मिठी मारली दोघेही अश्रू गाळू लागले. त्यादिवशी रूपेशला ओझं हलकं झाल्यासारखं वाटलं. एकाच आठवड्यात वडिलांना हृदयविकाराने मृत्यूला सामोरे जावे लागले. दोन वर्षापूर्वीच वडिलांना एक अॅटक आला होता. पण रुपेशला त्यांनी कळवलं नव्हते. मित्रांनो रुपेश जर वडिलांना भेटून भावना व्यक्त करु शकला नसता तर त्याला अपराधीपणाच्या भावनेने आयुष्यभर छळले असते. म्हणून मनातील भावनांना जाणून योग्य वेळी त्यांना वाट मोकळी करुन दिल्याने मनावरचे ओझे खूप हलके होते. मित्रांनो भावनांना नीट वाट दिली नाही तर भावनांचा उद्रेक होऊन अनर्थ घडण्याची दाट शक्यता असते. आजपर्यंत आपण भावनांपेक्षा बुध्यांकाला जास्त महत्त्व देत होतो. अभ्यासाअंती उत्तम बुध्यांकाची मुले जीवनात अयशस्वी झालेली तर सामान्य बुध्यांकाची मुले प्रचंड यशस्वी झाल्याचे आपल्याला दिसून येते. कारण सामान्य बुध्यांक असलेल्या मुलांचा भावनिक बुध्यांक हा उत्तम बुध्यांक असलेल्या मुलांपेक्षा जास्त होता.

भावनांचा उद्रेक झाला, त्यांचे दमन झाले तर मनुष्य क्रुरतेकडे व नैराश्याकडे झुकतो. अलीकडे ज्या कुटुंबात जास्त कलह – व्यसनं – भांडणं आहेत किंवा आई–वडिलांचा घटस्फोट झाला आहे किंवा मुलांकडे पूर्णतः दुर्लक्ष केले गेले आहे, अशा मुलांच्या भावनांचा उद्रेक होऊन त्यांच्या हातून हिंसक घटना घडताना दिसतात. नातवाने आजीचा खून करणे, नकार दिला म्हणून मुलीवर अॅसीड फेकणे, चाकूहल्ला करणे हे यातीलच प्रकार होत.

धर्माच्या – जातीच्या नावावर भावनांना हात

पान १० वर पुढे

मुशाफिरी

## *निसर्गसंपन्न अंदमान भाग ३*
## *जारवा आदिम संस्कृती आणि कोरल केव्हज*



लेखन – सौ. माधुरी शिवाजी विधाटे
सदस्य – पिंपरी चिंचवड साहित्य मंच
नवयुग साहित्य व शैक्षणिक मंडळ
मो.: ७५८८३२८४६९


राधानगर बीच आणि एलिफंट बीचवरील नितांत सुंदर सागरी जलजीवनाची रम्य अनुभुती घेऊन मन उल्हासित झाले. मग आम्ही पोर्ट ब्लेअर वरून १२० किलोमीटर अंतरावरील बारटॅंग येथील कोरल केव्हज पाहण्यासाठी निघालो. पहाटे अडीच वाजता निघून जिरकाटांग चेक पोस्टवर पोचलो. इथून पुढचा सर्व रस्ता घनदाट जंगलातून होता. भारतातील अजूनही आदिमानवाप्रमाणे जीवन जगणारी जारवा नावाची जमात या जंगलात आहे. यांची संख्या अतिशय कमी राहिली असल्यामुळे हे जारवा सुरक्षित वनक्षेत्र घोषित केले आहे. त्यामुळे जारवा जमातीच्या नैसर्गिक वर्तनाला कुठलीही बाधा न आणता वेळेचे आणि सुरक्षेचे काटेकोर नियम पाळूनच हा प्रवास करता येतो. त्यामुळे इतक्या भल्या पहाटे आम्ही तिथे पोहोचलो होतो.


गगनाला भिडणारे उंच उंच वृक्ष, लतावेलींची गच्च जाळी, बांबूची घनदाट बेटे, उंच झाडांवर उभारलेल्या छोट्या लाकडी झोपड्या पहात आणि झुळुझुळ वाहणारे निर्झर, पानांची सळसळ आणि पाखरांची किलबिल यांचा मधुर नाद ऐकत, पहाटेची आल्हाददायक थंडी अनुभवत हा रोमांचक प्रवास चालला होता. कुठेतरी जारवांचे दर्शन घडेल या उत्सुकतेने जंगलामध्ये दाट झाडीत नजर रोखून पाहत होतो. बऱ्याच प्रतीक्षेनंतर चार जारवा आदिवासी एका झाडाखाली दिसले. काळ्याकभिन्न रंगाच्या, कुरळ्या केसांच्या या आदिवासींनी कमरेला लज्जा रक्षणापुरती पानेवेली गुंडाळली होती. तिथे थांबायला व फोटो काढायला बंदी असल्याने आम्ही लगेच पुढे निघालो. मात्र आजच्या प्रगत काळात निसर्गसुलभ पद्धतीचे हे आदिम जगणे पाहून मनाला आश्चर्य वाटले. एकीकडे आपण सुखसंपन्न आयुष्य जगतो मात्र या आदिवासींना मूलभूत गरजांसाठी झगडावे लागते हा विरोधाभास जाणवला.

गर्भरेशमी हिरवा शालू नेसलेल्या वसुंधरेचे मनोरम रूप पहात आम्ही नीलांबूर जेट्टीवर येऊन पोहोचलो. तिथून बोटीतून सोनेरी उन्हात लपलपणाऱ्या लाटा, दोन्ही तीरावरची हिरवी वनराई बघत बारटॅंग म्हणजेच मिडल स्टेटला पोहोचलो. नंतर मॅनग्रुव्हज म्हणजेच खारफुटीतून प्रवास केला. वृक्षवेलींच्या नक्षीदार वेलबुट्टीच्या कमानीतून लाकडी झुलत्या पुलावरून जाताना खूपच मजा वाटली. जैवविविधतेने नटलेल्या या घनदाट जंगलातील रानगंधाने उल्हसित होत एका लांबलचक गुहेजवळ येऊन पोहोचलो.

चुनखडकाची धूप झाल्यामुळे नैसर्गिकरित्या निर्माण झालेली गुहा म्हणजेच कोरल केव्हज. चुनखडकाच्या सोनेरी, चंदेरी, शुभ्र गुलाबी, तांबूलवर्णी रंगछटांचे रंगदालन मनाला मोहवत होते. एका खडकातून मानवी देहाचा पाठीचा कणा, त्यातील मणके अतिशय स्पष्ट दिसत होते. तर कमळ, झुंबर, गदा, शंख, गणपती अशी अनेक शिल्पे चुनखडीतून साकारली होती. काही अमूर्त आकार कल्पनाशक्तीला आव्हान देत होते. गाईडने बॅटरीच्या प्रकाशात ही शिल्पे दाखवली. आणि या अद्भुत निसर्गसौंदर्याचा खजिना पाहून मन आश्चर्यचकित झाले. पुन्हा आनंददायक प्रवास करून आम्ही बारटॅंग जेट्टीवर परतलो. आणि तिथून जीपमधून मड व्होल्कॅनो पाहायला गेलो. या ज्वालामुखीतून जमिनीतून हवा, पाण्यातील

बुडबुडे यांसोबत चिखल बाहेर येत होता . अंदमानच्या बॅरन बेटावरील जागृत ज्वालामुखीचे दर्शन घेण्याचा योग आला नाही .पण तो देखील असाच आश्चर्यचकित करणारा अनुभव असणार याचा विश्वास वाटला. अंदमानच्या या सफरीत निसर्गसौंदर्याचे असे विविध अद्भुत आविष्कार बघताना मन आनंदून गेले . मग तुम्ही कधी येताय अंदमानला? ही देखणी निसर्गसंपदा तुम्हाला सादवत आहे.




पान ८ वरुन पुढे

घालून राजकीय लोक आज आपली गणिते मांडताना आघाडीवर दिसून येतात. भावनांच्या आहारी जाऊन माणसे एकमेकांचे वैरी होतात. म्हणून भावनांवर विजय मिळवणे किंवा नियंत्रण ठेवणे किंवा त्यांना योग्य ती वाट करुन देणे हे खूप महत्वाचे असते. भावनांचा समतोल ढळला कि निद्रानाश, रक्तदाब, अल्सर यासारखे अनेक आजार शरीरात बळावतात व ताणतणाव वाढतो. म्हणून आपल्या मनातील भावना संबंधित लोकांसमोर वेळेनुसार व्यक्त करा. फक्त व्यक्त करताना त्यामुळे आपले व समोरच्या व्यक्तीचे नुकसान होणार नाही व सामाजिक शांतता, सुव्यवस्था टिकून राहील व संस्कृतीला गालबोट लागणार नाही याची काळजी घ्या. म्हणजेच आपली प्रज्ञा जागवा. व्यक्त करता न येण्यासारख्या भावना कागदांवर लिहून काढा व न वाचचता तो फाडून टाका. भावनांना वाट देण्यासाठी योग्य ते माध्यम शोधा, व्यायाम करा, खेळ खेळा, गप्पा मारा, विनोद करा, नाचा-बागडा, मोठ्याने गाणी म्हणा, सहलीला जा, समोरच्याने ऐकून घ्या, त्याला सहानभूती द्या. अनेक मित्र-मैत्रिणी गोळा करा, समोरच्याच्या भावनांचा आदर करा, दुःख झाले तर रडून घ्या, राग आला तर घरातील उशीवर (पिलो) राग शांत होईपर्यंत गुद्दे मारा. योगासने करा, ध्यान करा व आनंदाने जीवन जगण्यासाठी आवश्यक त्यावेळी बिनधास्त आपल्या भावना व्यक्त करुन भावनांना वाट द्या. यातच सुखी जीवनाचे रहस्य दडलेले आहे.

***मुलींना दिली सरस्वतीची सावली***
***अशी ही थोर माऊली***
***सावित्रीबाई फुलेंच्या कार्याला***
***सलाम पावलोपावली...***

# मी सावित्री बोलते



**बीना राजेश बुनगे**
माध्यमिक शिक्षिका - सेवासदन संस्था, पुणे
धायरी, पुणे - ४१.
मो.: ९८८१५८५०४०

नमस्कार,

मुलाबाळांना आपण शिकवू
आपणसुध्दा शिकू
विद्या घेऊनी ज्ञान वाढवून
नीतीधर्महिं शिकू

ओळखलत मला? मी सावित्रीबाई जोतीबा फुले आज माझ्या जयंतीच्या निमित्ताने मला तुमच्याशी बोलावसं वाटलं. मुलींनो इथ तुमच्यातील कलागुण तुम्ही दाखवता आहात हे पाहून मला खूप बरं वाटलं. शिक्षणाची दारं तुम्हाला खुली आहेत. तुम्ही मनापासून ज्ञान घेऊन स्वतःला चांगलं सिध्द करत आहात हे पाहून खरच मी धन्य झाले. पणा बाळांनो, एक सांगू हे शिक्षण तुमच्या पर्यंत येण्यासाठी जोतीबांना आणि मला खूप कष्ट घ्यावं लागलं. तसं पाहिलं तर वयाच्या ९ व्या वर्षी जोतीबांबरोबर माझं लग्न झालं. मला कायसुध्दा समजत नव्हतं तेव्हा अल्लडच हो मी. पण जोतीबांनी माझ्या शिक्षणाचा श्रीगणेशा केला. मला शिकवलं. कारण त्यांना हे माहित होतं की 'एक पुरुष शिकला जर तो एकटाच शिकतो पण एक स्त्री शिकली तर सारं कुटुंब शिकतं.' शिक्षणाचा वसा मी पण घेतला आणि त्याकाळच्या मुली-बायांना शिकवू लागले. आपल्या इथं पुण्यातच-भिडेवाड्यात पहिली स्त्री शिक्षिका आणि पहिली मुख्याध्यापिका म्हणून मी काम करत होते. पण तो सोपं नव्हतं ग मुलींनो.

समाजातील कर्मठ लोकं मला खूप त्रास देत होते. शिव्या द्यायचे. शेणा-मातीचे गोळे माझ्या लुगड्यावर फेकून मारायचे एवढच नाय तर जोतीबांना आणि मला जीव मारण्याच्या धमक्याही द्यायचे पण आम्ही डगमगलो नाही, घाबरलो नाही, सगळं सहन केलं म्हणूनच तुम्हाला सांगते मुलींनो,

काम पहिलं शिकायचं आहे, दुसरं काम खेळ खेळा
जमेल तेव्हा झाडणं पुसणं, हात लावा घरकामाला
जा आधि जा शाळेला

जोतीबांना फक्त एक पती म्हणून नाही तर एक समाजसेवक म्हणून भजत होते, दीनदलितांसाठी, स्त्रियांसाठी, वंचितांसाठी, शेतकऱ्यांसाठी, ज्यांच्याज्यांच्यावर अन्याय, जुलुम होत होता त्या सगळ्यांसाठी जोतीबांच्या खांद्याला खांदा लावून मी काम करत होते.

मुलींनो, बालविवाहाला आम्ही विरोध केला, स्त्रियांच्या शिक्षणासाठी दिवसरात्र झगडलो, ज्या स्त्रिया फसल्या गेल्या, किंवा ज्यांच्यावर अन्याय होऊन त्या गरोदर राहिल्या तर त्यांच्यासाठी बालहत्या प्रतिबंधक गृह सुरु केलं. त्यांची बाळंतपण केली, विधवेची हालत तर खूप दयनीय होती, तिचा खूप छळ व्हायचा अशावेळी विधवेच्या पुनर्विवाहाचाही आम्ही आग्रह केला. दुष्काळासारखी परिस्थिती आल्यावर शेतकऱ्याचे खूप हाल व्हायचे गं. अशावेळी शेतसारा अन कर्ज यातून त्यांची मुक्तता व्हावी म्हणून जोतीबांनीही इंग्रजांना शेतकऱ्याची परिस्थिती समजून सांगितली. विधवांच केशवपन होत होतं तिथं न्हाव्याचा संप घडवून आणला. एक सांगू मुलींनो, या सावित्रीच्या नावापुढे फुले आहेत पण तिन फक्त काटेच सोसले ग. दगडगोटे खाल्ले. तरीही मी हारले नाही, डगमगले नाही, त्याकाळच्या सामाजिक व्यवस्थेनं फक्त आणि फक्त स्त्रीचं शोषणच

केलं. त्या काळच्या पुरुषप्रधान संस्कृतीनं स्त्रियांचे जगणं दुय्यम करुन टाकलं होतं. आणि म्हणूनच स्त्रीला स्वातंत्र्य, समता मिळाली पाहिजे हाच अट्टहास होता ग आमचा. आणि म्हणूनच जोतीराव गेल्यावर त्यांच्या पार्थिवाला मी स्वतः अग्नी देत या व्यवस्थेचंही दहन केलं.

म्हणनूच मुलींनो तुम्हाला सांगते जात-धर्म हे काहीही न मानता तुम्ही सगळ्यांशी समतेनं वागा.

मुलींनो, आज मी सगळीकेडे पाहिले की मला खूप आनंद होतो. स्त्रीया शिकल्या, स्वतःच्या पायावर उभ्या राहिलेल्या पाहून माझे मन खूप भारावून जाते. सर्व क्षेत्रात त्या पुढे आहेत. जोतीबा आणि मी केलेल्या कामाचा हा परिणाम खूप सकारात्क आहे. दाही दिशांना आपल्या यशाचे चौघडे सर्वदूर स्त्रियांनी वाजवून आम्हीही कुठे कमी नाही हे दाखवून दिले आहे.

पण काही वेळा मला खंतही वाटते, आजच्या स्त्रिया सुरक्षित आहेत का? बलात्कारासारख्या घटना जेव्हा समाजात घडतात तेव्हा खूप वाईट वाटते. म्हणून म्हणते तुम्ही नेहमी सावधतेने वागा. उघड्या डोळ्यांनी जगाकडे बघा. क्षणिक मोहाला बळी पडू नका. चुकीचे पाऊल उचलून धोका पत्करु नका. समाजातल्या गुन्हेगारी, भ्रष्टाचार, गढूळ राजकारण, खोटेपणा यांना खतपाणी घालू नका. आयुष्यात प्रामाणिकपणा कधीही सोडू नका. हाती घेतलेले काम जीव झोकून देऊन यशस्वीपणे पूर्ण करा. स्वतःची ओळख निर्माण करा. स्वयंसिध्द व्हा. आणि ताठ मानेने जगा, खूप वाचन व लेखन करा.

जाता जाता तुम्हाला शुभेच्छा देते, आशीर्वाद देते आणि पुन्हा एकच विनंती करते -

नकोच इच्छा आरामाची
ईर्षा धरुनी शिक्षणाची
संधी घ्या तुम्ही छान आजचि
अनुकुलता बघा कालगतीची
न कुरकुरता, न आळसता शाळेतं जाऊ शिकू चला
गुलामगिरीची युगायुगाची बेडी तोडू चला...

### ❖ स्वागत करू नववर्षाचे ❖

सरत्या वर्षाला देऊन निरोप
स्वागत करू नववर्षाचे
पुसून टाकून गत दुःखे
आनंदाने पुढे चालायचे

जिथे शेवट तिथेच सुरुवात
हाच खेळ निशा - प्रकाशाचा
असेच फिरते कालचक्र
यात बदल घडे न त्याचा

नवे संकल्प नव्या प्रेरणा
हर्षाने भरू दे जीवनात
सुखाची भरून वाहू दे ओंजळ
हीच कामना करू नववर्षात

प्रेम मनात घेऊ साठवून
हेवे दावे विसरून जाऊ
नवीन वर्षाला करू सुरुवात
आनंदी , उत्साही सदा राहू

- शुभांगी धारमळकर

## नूतन वर्षाभिनंदन २०२५

नवीन वर्षात करूया काही खास,
हसता हसता पूर्ण होवो प्रत्येक विचार,
नव्या पर्वाची होवो चमकदार सुरुवात,
आयुष्य असो आनंदाने भरलेला आणि समृद्ध!




## नायगाव येथे क्रांतिज्येती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

स्त्रीशिक्षणाच्या जनक क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा उचित सन्मान होण्यासाठी त्यांच्या द्विशताब्दी जयंती उत्सवापर्यंत राष्ट्रीय स्मारकाचे काम पूर्ण करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. दरम्यान या स्मारकासाठी प्रशासनाने १० एकर जागेचे तत्काळ अधिग्रहण करावे आणि त्यासाठी आम्ही निधीची कमतरता पडू देणार नाही, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, पर्यटनमंत्री शंभूराज देसाई उपस्थित होते.

## ❖ माळी महासंघातर्फे रॅलीचे आयोजन ❖





**सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या मुलींच्या पहिल्या शाळेच्या १७७ व्या वर्षपूर्ती निमित्ताने १ जानेवारी रोजी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. फुले दांपत्याच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी माळी महासंघतर्फे भिडेवाडा ते महात्मा फुलेवाडा या मार्गावर रॅली काढण्यात आली होती. यामध्ये ढोल पथक, भव्य रांगोळी, महिला आणि नागरिकांचा सहभाग हे रॅलीचे वैशिष्ट्य ठरले. या रॅलीमध्ये अविनाश ठाकरे यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.**

## सुरेशचंद्र वाघ यांच्या कथासंग्रहाचे प्रकाशन

सुरेशचंद्र वाघ यांच्या 'हास्यकोन त्रिकोण' या विनोदी कथासंग्रहाचे प्रकाशन
प्रसिद्ध विनोदी साहित्यकार व सकाळचे उपसंपादक सु .ल. खुटवड यांच्या हस्ते झाले.
यावेळी अभिनेते व ज्येष्ठ एकपात्री कलाकार दिपक रेगे, अभिनेत्री भाग्यश्री देशपांडे,
माळी आवाज संपादिका रागिनी लडकत आदी उपस्थित होते.
सर्व मान्यवरांनी शुभेच्छा रूपे आपले मनोगत व्यक्त केले.
संध्या भावे यांनी सूत्रसंचालन केले तर सुवर्णलता विधाते यांनी आभार मानले.

---

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त
३ जानेवारी रोजी विविध संघटनांच्या वतीने अभिवादन
गंज पेठ येथील समता भूमी येथे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले
यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यासाठी समाजबांधव उपस्थित होते.
त्याचबरोबर सारसबाग येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले
यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला.
यावेळी माळी समाजाचे अनेक संस्थांचे मान्यवर उपस्थित होते

---

## ❖ महात्मा फुले मंडळ पुणे ६६ वर्धापन दिन साजरा झाला ❖

दिनांक १८ डिसेंबर २४ रोजी संध्याकाळी पाच वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे
महात्मा फुले मंडळाचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला.
अध्यक्षस्थानी – मधुकर राऊत (महात्मा फुले मंडळ अध्यक्ष)
तसेच बबनराव गायकवाड, श्री दिलीप राऊत, श्री दिलीप शेळवंटे, श्री. दिलीप भाई लोखंडे,
सौ. स्नेहा कुदळे, कु. चिंतामणी राऊत, कुमारी कादंबरी राऊत, श्री. देव मोरे ऑकेस्ट्रॉ
यांचा सत्कार मंडळातर्फे आयोजित केला होता.
सूत्रसंचालन – श्री चांगदेव पिंगळे सर व आभार – ॲडव्होकेट दिगंबर आलाट यांनी केले.
प्रसंगी अनेक मान्यवर मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## नविन कार्यालय नोंदणी **वर सूची** जानेवारी २०२५

| क्र. | नाव व स्थळ | जन्मतारीख | उंची | शिक्षण इतर माहिती | मा.प्राप्ती रु. | अपेक्षा |
|---|---|---|---|---|---|---|
| २४/१२०१ | तेजस ननावरे, मुंबई | ०३.०२.१९९७ | ६' | बीई कॉम्प्यु. सायन्स, एमएस शिक्षण चालू, | | शिकागो, अमेरिका नोकरी अमेरिका, सुस्वरुप |
